# नागपूर सॉलिड वेस्ट प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड

**कार्यकारी गोषवारा**

१. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र महानगरपालिकेच्या घनकचरा (एमएसडब्ल्यू) व्यवस्थापनाच्या क्षेत्रात अतिशय मागे आहे. नियोजन आयोगाच्या कार्यदलाच्या अहवालानुसार महाराष्ट्र राज्यात कचरा व्यवस्थापनाचे प्रमाण २८% आहे. दिल्ली, गोवा, आंध्र प्रदेश वगैरे राज्यांच्या तुलनेत ही टक्केवारी अतिशय कमी आहे. कचरा व्यवस्थापनाची वाढती गरज पाहता नागपूर येथील नागपूर महानगरपालिकेने (एनएमसी) महापालिकेच्या घनकचऱ्याद्वारे (एमएसडब्ल्यू) उर्जा निर्मिती करण्यासाठी भांडेवाडी, नागपूर येथे डिझाईन, बांधकाम, वित्त पुरवठा, कार्यान्वयन आणि हस्तांतरण (डीबीएफओटी) पद्धतीने एक प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला.

२. एनएमसी द्वारा दिनांक २९.११.२०१४ रोजी प्रसिद्धी द्वारे ईओआय पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात आले आणि त्यानंतर डीबीएफओटी पद्धतीने एमएसडब्ल्युचे व्यवस्थापन करण्यासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन (एमएसडब्ल्यूएम) सुविधेचे बांधकाम, कार्यान्वयन आणि देखभाल ह्या कामांसाठी निविदाकारांची निवड करण्यासाठी दिनांक १९.०१.२०१५ रोजी आरएफपी प्रस्तावाची विनंती करण्यात आली. ह्या स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेत मेसर्स एसेल इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड आणि मेसर्स हिताची झोसन इंडिया प्राय. लिमि. यांच्या संयुक्त उपक्रमाने निविदा जिंकली. ह्या उपक्रमाला ४ जानेवारी २०१७ रोजी काम दिल्याचे पत्र (एलओए) देण्यात आले. ह्या प्रकल्पासाठी ह्या उपक्रमाद्वारा मेसर्स नागपूर सॉलिड वेस्ट प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेन्ट प्राय. लिमि. (एनएसडब्ल्यूपीएमपीएल) ची एका विशेष कार्यासाठी निर्माण केलेली संस्था म्हणून स्थापना करण्यात आली. ह्या कंसेशनायरने २६ एप्रिल २०१७ रोजी एलएमसीकडे रू.२१८.८ लाख प्रकल्प विकास शुल्क आणि रू.५०० लाख इतक्या रकमेची कार्यक्षमतेसाठी बँक गॅरेन्टी जमा केली.

३. नागपूर सॉलिड वेस्ट प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेन्ट प्रायव्हेट लिमिटेड (एनएसडब्ल्यूपीएमपीएल) द्वारा शाश्वत हरित उर्जा निर्मितीसाठी घनकचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी अतिशय सिद्ध आणि भरवशाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला. हिताची झोसेन यांचे इन्सिनरेशन तंत्रज्ञान कचऱ्यावर प्रक्रिया करणे आणि शाश्वत हरित उर्जा निर्माण करण्यासाठी अतिशय कार्यक्षम क्षमता पुरवत आहे.

४. याचिकाकर्ता, एनएसडब्ल्यूपीएमपीएल ह्या कंपनीची स्थापना कंपनी कायदा २०१३ अंतर्गत करण्यात आली असून त्यांचे नोंदणीकृत कार्यालय ५१३–ए, ५वा मजला, कोहिनूर सिटी, किरोल रोड, कुर्ला (पश्चिम), मुंबई–४०००७० येथे आहे. एसेल इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड (ईआयएल) ही एनएसडब्ल्यूपीएमपीएलची प्रवर्तक असून त्यांच्यापाशी पायाभूत सुविधांच्या उद्योगात १० हून अधिक वर्षांचा अनुभव आहे.

५. करारानुसार एमएसडब्ल्यू प्रक्रिया सुविधेचे डिझाईन ८०० (+/–२०%) मेट्रिक टन एमएसडब्ल्यू प्रतिदिन वर प्रक्रिया करण्याची क्षमता असेल असे असले पाहिजे. ह्या कंसेशनायरने प्रक्रिया प्रकल्पाच्या प्रवेशद्वारापाशी आलेल्या आणि वजन केलेल्या प्रत्येक टन एमएसडब्ल्यू साठी टिपिंग शुल्क (ज्याला प्रारंभिक टिपिंग शुल्क असे देखील म्हणता येईल – रू.२२५ प्रति टन व वाटाघाटी पश्चात त्यात प्रतिवर्ष ४.५% वाढ) नमूद केले होते. एमएसडब्ल्यू प्रक्रिया संयंत्राच्या आणि एसएलएफच्या (सायन्टीफीक लॅन्डफील) विकासासाठी एमएनसीद्वारा एमएसडब्ल्यू प्रक्रिया सुविधेसाठी १० एकर जागा देण्यात आली. कंसेशन कराराच्या अटींनुसार, एनएसडब्ल्यूपीएमपीएल द्वारा प्रकल्पाच्या जागेच्या परवान्याचा लाभ घेण्यासाठी एनएमसीला प्रतिवर्ष रू.१ प्रति चौरस फुट दराने लीज भाडे देण्याचे मान्य करण्यात आले.

६. कामाची व्याप्ती खालील प्रमाणे:

ए. कंसेशन कालावधीत एमएसडब्ल्यूच्या आश्वासित प्रमाणासाठी भांडेवाडी, नागपूर येथ ८०० (+/–२०%) एमटी प्रतिदिन क्षमतेच्या मिश्र एमएसडब्ल्यू प्रक्रिया सुविधेचे डिझाईन, बांधकाम आणि कार्यान्वयन करणे.

बी. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन सुविधेच्या परिसरात एमएसडब्ल्यूची वाहतूक करण्यासाठी पुरेशा संख्येच्या वाहनांची तरतूद व कार्यान्वयन

सी. एसडब्ल्यूएम (घनकचरा व्यवस्थापन) नियम २०१६ नुसार प्रकल्पाच्या १५ वर्षांच्या कालावधीपर्यंत विद्यमान शास्त्रोक्त पद्धतीने जमिनीचा भरणा केलेल्या जागेचे क्लोजर व देखभाल.

डी. नवीन शास्त्रोक्त पद्धतीने जमिनीचा भरणा (सायन्टीफीक लॅन्डफील) करण्याच्या प्रक्रियेचे आणि प्रक्रिया अवशेषाची विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेचे डिझाईन, बांधकाम आणि कार्यान्वयन. ह्या नवीन एसएलएफ मध्ये ३ सेल्स असतील जे सीओडी पासून ४थ्या, ९व्या आणि १३व्या वर्षाच्या अखेरीस बंद करण्यात येतील. बंद करण्यात आलेल्या एसएलएफची त्यांच्या संबंधित क्लोजर तारखेपासून १५ वर्ष देखभाल करण्यात येईल.

ई. ह्या करारातील तरतुदींनुसार आणि त्या अनुशंघाने (टाकण्यात आलेला कचरा इतरत्र हलविणे वगैरे) कंसेशनायर यांनी सर्व जबाबदाऱ्या व कामे पूर्ण करणे किंवा ह्या कंसेशनायर यांनी ह्या करारांतर्गत आवश्यक अथवा सर्व जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी सर्व कामे करणे.

७. कामाच्या व्याप्तीत सध्याच्या एसएलएफचे काम पूर्ण करणे (क्लोजर) व देखभाल, नवीन एसएलएफचे बांधकाम व काम पूर्ण करणे आणि नवीन एसएलएफची देखभाल. याचिकाकर्त्याने काम पूर्ण केल्यानंतर पोस्ट क्लोजर उपक्रमासाठी टिपिंग शुल्काचा काही भाग महसूल बाजूला ठेवला आहे.

८. ह्या प्रकल्पात एसडब्ल्यूएम नियम २०१६ मध्ये बंधनकारक केल्यानुसार एमएसडब्ल्यूची पूर्वप्रक्रिया समाविष्ट असून ह्या पूर्वप्रक्रिया सुविधेत एमएसडब्ल्यू उतरवून घेणे, मॅन्युअल व यंत्राद्वारे त्याची विभागणी करणे, एमएसडब्ल्यूच्या पर्वप्रक्रियेची तयारी करणे आणि जैविक घटकांसाठी बायो–ड्राइंग विभाग यांचा समावेश आहे. एनएमसी द्वारा प्रस्तावित एमएसडब्ल्यूएम सुविधेत ताजा कचरा पुरविण्यात येईल. टिपिंग फ्लोअरवरील नियोजित ठिकाणी कचरा उतरविण्यात येईल. एमएसडब्ल्यू स्टोरेज पिटमध्ये कचरा हाताळला जातो. पिटमधून लिचेट काढण्यासाठी ड्रेन असेल आणि अशा प्रकारे कचऱ्यातील लिचेट कलेक्शन पिटमध्ये जमा करण्यात येईल. पुढचा टप्पा यांत्रिकी पद्धतीने विभागणी करणे जे बायोड्राइंग नंतर करण्यात येईल. पूर्वप्रक्रिया केलेला एमएसडब्ल्यू पूर्व प्रक्रिया साठवणी विभागात साठविण्यात येईल. शेवटी सर्व टाकाऊ माल वाहनांमधून जमिनीचा भरणा करण्याच्या ठिकाणी पाठविण्यात येईल.

९. नागपूर मधील प्रस्तावित प्रकल्पाचे टॅरिफची गणना प्रकल्पातील खास वैशिष्ट्यांमुळे, जी ह्या शहराशी खास निगडित असून नविन नियामक चौकटीनुसार आहेत ह्या नियामक चौकटीत खालील बाबीचां समावेश आहे:

- नवीन एसडब्ल्यूएम नियम, २०१६ मधील डब्ल्यूटीई प्रकल्पांसाठी एमएसडब्ल्यूची पूर्वप्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे.

- पुर्वीच्या एसडब्ल्यूएम नियम २००० मध्ये नमूद करण्यात आलेल्या ८५० डि.से. तापमानच्या तुलनेत नवीन एसडब्ल्यूएम नियम २०१६ मध्ये दोन सेकंदांच्या रेसिडेन्स कालावधीसह किमान ९५० डि.से. तापमान साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून फर्नेसचे डिझाईन करण्याची आवश्यकता नमूद करण्यात आली आहे. फर्नेसमध्ये अधिक १०० डि.से. तापमान राखण्यासाठी त्याचे डिझाईन, आतील रिफ्रॅक्टरी लाइनिंग, गॅसचा वेग (व्हेलोसिटी) वगैरेत बदल करण्याची गरज आहे.

- वारा आणि भुकंप ह्या गोष्टीसुद्धा वेगळ्या असल्यामुळे बांधकाम रचना आणि त्याचा खर्च ह्यात बदल झाला आहे.

- हवा आणि भुकंप ह्या गोष्टींच्या वेगळेपणासह, येथील जमिन काळी मऊ जमिन आहे व तिची धारणाशक्ती कमी आहे त्यामुळे सिविलच्या कामाच्या खर्चात वाढ झाली आहे.

- एमएसडब्ल्यूच्या पूर्वप्रक्रियेमुळे सिविलच्या कामाच्या खर्चात वाढ झाली आहे.

- नागपूर प्रकल्पात सध्याचा कचऱ्याचे पुनर्वसन आणि त्यानंतर ते बंद करणे यांचा समावेश आहे. सध्या एसएलएफ मध्ये टाकण्यात आलेल्या कचऱ्याचे योग्य पुनर्वसन करण्याची गरज आहे. त्यानंतर शास्त्रोक्त पद्धतीने ते बंद केले पाहिजे.
- टाकाऊ माल आणि प्रक्रिया संयंत्रातील प्रक्रियेत उरलेला प्रक्रिया अवशेष ह्यासाठी नवीन एसएलएफचे बांधकाम करावे लागेल. त्यासाठी त्याचे डिझाईन व बांधकाम करण्याची गरज आहे.
- ह्या प्रकल्पात एक्सपॅट सर्व्हिसेसची गरज, विद्यमान एसएलएफची देखभाल यांचा समावेश आहे ज्यामुळे कार्यान्वयन व देखभाल खर्चात थोडी वाढ होते.

१०. राज्यातील परवानाधारक वितरकांना वीजेची विक्री करण्यासाठी, एनएसडब्ल्यूपीएमपीएल द्वारा विद्युत कायदा, २००३ मधील कलम ६१(१) आणि ८६(१) अंतर्गत भांडेवाडी, नागपूर येथे उभारण्यात येत असलेल्या महापालिकेच्या घनकचऱ्यावर आधारित वीज प्रकल्पातून ११.५ एमडब्ल्यू क्षमतेचा वीज पुरवठा करून महाराष्ट्रातील परवानाधारक वीज वितरकांना त्याची विक्री करण्यासाठी दर निश्चिती करण्यासाठी मान. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेद्वारा एनएसडब्ल्यूपीएमपीएल खालील विनंती केली आहे.

१) एनएसडब्ल्यूपीएमपीएल च्या ११.५० मेगावॅट एमएसडब्ल्यूच्या पूर्वप्रक्रियेवर आधारित डब्ल्यूटीई प्रकल्पाची वीज खरेदी करण्यासाठी सोबतच्या दर याचिकेचा मंजुरीसाठी स्वीकार करणे.

२) माननीय सीईआरसी द्वारा स्वीकृत दर रचनेनुसार रू.७.८०/केडब्ल्यूएच दराने समांतर दराला मंजुरी देणे.

३) प्रकल्पाला मेरिट ऑर्डर डिस्पॅच प्रिन्सिपल्समधून सूट देणे.

४) शून्य कंत्राट डिमांड शुल्काच्या लाभाचा विचार करण्यासाठी परवानाधारक वीज वितरकांना सूचना देणे

५) प्रकल्पाच्या ग्रिडमध्ये सोडलेल्या वीजेच्या बदल्यात प्रकल्पाचे बंद असताना किंवा सुरू करताना वापरलेल्या वीजेचा विचार करण्याच्या परवानाधारक वीज वितरकांना सूचना देणे.

६) वीजेची थेट तिसऱ्या पक्षाला विक्री करण्यात आल्यास प्रकल्पातील विजेच्या विक्रीवर क्रॉस सब्सिडी सचार्जला सूट देणे.

७) ही याचिका दाखल करताना काही चूक झाल्यास/काही वगळल्यास/तृटी असल्यास त्याबद्दल क्षमा करावी आणि ह्या याचिकेत काही मुद्दे समाविष्ट समाविष्ट करणे/बदलणे/सुधारणा करणे/काही भागात बदल करणे आणि आवश्यक असेल त्यानुसार पुन्हा दाखल करण्याची परवानगी द्यावी.

८) माननीय आयोगाला योग्य वाटेल त्यानुसार आणि ह्या केसची वस्तूस्थिती व परिस्थितीनुसार सदर आदेश जारी करणे.

११. माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २२ नोव्हेंबर २०१७ रोजी तांत्रिक प्रमाणीकरण सत्र घेतले. माननीय आयोगाने याचिकाकर्त्याला डेटागॅप्सची पुर्तता करण्यास सांगितले व सुधारीत याचिका सादर करण्यास सांगितले. याचिकाकर्त्याने सुधारीत याचिका २८ नोव्हेंबर २०१७ रोजी सादर केली, जी माननीय आयोगाने ३० नोव्हेंबर २०१७ रोजी दाखल करून घेतली. माननीय आयोगाने एनएसडब्ल्यूपीएमपीएल यांना विद्युत कायदा २००३ मधील कलम ६४ (२) अंतर्गत एक सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करून जनतेकडून सूचना/आक्षेप मागविण्याचे आदेश दिले.